**<u>ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याबाबत सूचना :-</u>**

१. ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याकरिता प्रथमतः परिषदेच्या www.mscepune.in या संकेत स्थळास भेट द्यावी.

२. सदर संकेत स्थळावरील G.C.C. Examination वर Click करावे. त्यानंतर स्क्रीनवर Login चा बॉक्स दिसेल त्यामध्ये दिलेली माहिती भरावी व Login करावे.

३. Login केल्यावर स्क्रिनवरील Create Challan वर Click करून चलनाची प्रिंट काढुन परीक्षा शुल्क बँकेत जमा करावे.

४. Login केल्यानंतर स्क्रीनवर Fill Challan हा बॉक्स दिसेल त्यामध्ये दिलेली माहिती भरावी व Submit करावे.

५. Submit केल्यानंतर स्क्रीनवर भरलेल्या चलनाची माहिती दिसेल. Fill Form वर क्लिक केल्यावर Application Form दिसेल. सदरच्या Application Form मध्ये खालील प्रमाणे माहिती भरावी.

A. General Register No. - सदरच्या रकान्यात विद्यार्थ्यांनी टंकलेखन संस्थेच्या जनरल रजिस्टर मधील आपला क्रमांक नमूद करावा.

B. Student's Full Name - सदरच्या रकान्यात आडनाव, स्वतःचे नाव, वडिलांचे नाव/ पतीचे नाव व आईचे नाव नमूद करावे.

C. Student's Exam Details-

Type Writing/ Short Hand - T/W व S/H पैकी हवा असलेल्या पर्यायावर Click करावे.

Language - इंग्रजी, मराठी, हिंदी या पैकी योग्य त्या विषयाच्या पर्यायावर Click करावे.

Speed - ३०,४०,५०,६० व इतर पैकी योग्य त्या गतीचा पर्याय निवडावा.

Batch - **या परीक्षेपासून परीक्षा कालावधी ५ दिवसांचा करण्यात आलेला आहे. परीक्षेची बॅच कोणत्याही कारणामुळे बदलुन देण्यात येणार नाही त्यामुळे अधिसूचनेतील वेळापत्रकानुसार आपणास हवी असलेली योग्य ती बॅच निवडावी.**

Pre - Condition Required - या मध्ये आपण ज्या विषयाकरिता आवेदनपत्र भरत आहात त्या विषयाकरिताची आवश्यक पुर्वअट दर्शविण्यात येईल. तसेच ४० गतीच्या विषयाकरिता विद्यार्थी संबंधीत ३० गतीची विषयाची परीक्षा यापुर्वी उत्तीर्ण असेल तर ३० हा पर्याय निवडावा. ३० व ४० गतीच्या विषयाकरिता एकाच वेळेस आवेदनपत्र भरत असल्यास Appeared हा पर्याय निवडावा.

Pre - Conditions Details - उपरोक्त Pre - Condition Required मध्ये निवडलेल्या पर्यायानुसार पुर्वअट बाबतच्या परिक्षेची माहिती महिना, वर्ष, विषय, सीट नं. या रकान्यात भरावी.

D. Student Personal Details -

Student Address- सदरच्या रकान्यात विद्यार्थ्यांचा रहिवाशी (पत्रव्यवहाराचा) पत्ता नमूद करावा.

Gender - पुरुष / स्त्री यांपैकी योग्य पर्यायावर Click करावे.

Date of Birth -सदरच्या रकान्यात दिवस, महिना, वर्ष यानुसार माहिती भरावी.

Date of Admission - Institute मध्ये प्रवेश घेतल्याचा दिनांक नमूद करावा.

Present Days - प्रवेश घेतल्यापासून ते परिक्षेच्या तारखेपर्यंतचे उपस्थित दिवस लिहावेत.

Handicapped -६०% व त्यापेक्षा जास्त अपंग असल्याचे सिवील सर्जनचे प्रमाणपत्र असल्यास Yes वर Click करावे. नसल्यास No वर Click करावे.

Center No. - सदर रकान्यामध्ये आपल्या संस्थेचा परीक्षा केंद्र क्रमांक दर्शविण्यात येईल.

Latest Educational Qualification - सदरच्या रकान्यात आपल्या नजिकच्या काळातील शैक्षणिक पात्रतेच्या योग्य त्या पर्यायाची निवड करावी.

Photo Identification - सदरच्या रकान्यामधील Aadhar card, Election Photo Voter card, Driving License, Passport, School Bonafide Certificate या पैकी एका पर्यायाची निवड करावी.

Photo Identification No. - उपरोक्त Photo Identification मध्ये निवडलेल्या पर्यायानुसार सदर ओळखपत्राचा क्रमांक नमुद करावा.

Upload Photo - फोटो कागदावर चिटकवून खाली सही करावी. तो Scan करुन Jpg/ Jpeg File बनवावी. त्याची साईज ३० KB पर्यंत असावी. संपूर्ण माहिती पुन्हा वाचून खात्री केल्यानंतर Submit या बटनावर Click करावे. Submit या बटनावर Click केल्यानंतर **आवेदनपत्रामध्ये कोणताही बदल केला जाणार नाही याची गांर्भीयाने नोंद घ्यावी.**

**६. Submit केलेल्या आवेदनपत्राच्या दोन छायाप्रती काढून ठेवाव्यात. त्यातील एका प्रतीवर विद्यार्थी व संस्थाचालकांनी स्वाक्षरी करुन नाव व संस्था कोड लिहावा व शिक्षणाधिकारी (माध्य.) यांच्याकडे इतर कागदपत्रांसोबत नियोजीत वेळेत जमा करावे. व दुसरी प्रत आपल्या दप्तरी जपून ठेवावी.**

## संस्थाचालक व विद्यार्थी यांच्यासाठी महत्त्वाच्या बाबी :-

१. उमेदवारांच्या माहितीच्या नोंदीची परीक्षापूर्व यादी (Pre-List) वेबसाईटवर ऑनलाईन दिली जाईल. ती पाहून आवेदनपत्रानुसार माहिती बरोबर असल्याची खात्री करावी. सदर माहितीत तफावत आढळल्यास सदरच्या प्रिलिस्ट मध्ये ऑनलाईन दुरुस्ती करावी. इतर कोणत्याही प्रकारे प्रिलिस्ट मध्ये दुरुस्ती करण्याकरीता अर्ज करू नये. प्रत्यक्ष परीक्षेच्या दिवशी कोणताही बदल मान्य करुन दिला जाणार नाही.

२. परीक्षेपूर्वी ८ दिवस अगोदर पात्र उमेदवारांची **प्रवेशपत्रे (हॉल तिकीट)** संस्थांनी संबंधित शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद/ शिक्षण निरिक्षक, बृन्मुंबई (प/द/उ) यांचे कार्यालयातून घेऊन जावीत.

३. ऑनलाईन आवेदनपत्रात व बॅचलिस्टमध्ये उमेदवाराचे नाव व नावाचे इंग्रजी स्पेलिंग, बॅच, विषय, केंद्र क्रमांक, उमेदवाराची स्वाक्षरी याबाबतचा तपशील अचूक नोंदविण्यात यावा.

**४. परीक्षेची बॅच कोणत्याही कारणामुळे बदलुन देण्यात येणार नाही, जे विद्यार्थी विद्यापीठ परीक्षा तसेच इतर परीक्षेस प्रविष्ठ झालेले आहेत, त्या विद्यार्थ्यांकरिता शक्यतो परीक्षेच्या शेवटच्या दिवसाची म्हणजेच रविवारची (५ व्या दिवसाची) बॅच विद्यार्थ्यांच्या संमतीने निवडण्यात यावी.**

**५. विषयबदल, बॅचबदल, केंद्रबदल, फोटो व सही बदल किंवा नावातील स्पेलिंग मध्ये संगणकामुळे चूक झाली असल्यासच ऑनलाईन आवेदनपत्रानुसार विहीत नमुन्यात अर्ज प्राप्त झाल्यानंतर सदर परीक्षेच्या निकालापुर्वी बदल करून देता येईल. मात्र ऑनलाईन आवेदनपत्रामध्ये संबंधीत टंकलेखन/लघुलेखन संस्थेकडुन विषयबदल, बॅचबदल, केंद्रबदल, फोटो व सही बदल किंवा नावातील स्पेलिंग मध्ये चुक झालेली असल्यास कोणत्याही परिस्थितीत बदल करून दिला जाणार नाही, याची गांभीर्याने नोंद घेण्यात यावी. त्याकरिता संस्थांनी आवेदनपत्राच्या २ छायांकित प्रती काढून ठेवाव्यात.**

६. **परीक्षार्थीने भरलेले परीक्षा शुल्क, विलंब शुल्क, कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही याची उमेदवारांनी व संस्थाचालकांनी नोंद घ्यावी. त्यामुळे अतिरिक्त शुल्क भरण्यात येवू नये.**

७. परीक्षा शुल्काच्या चलनावर दिनांक, स्वाक्षरी, संस्थेचे नांव व सांकेतांक असल्याची खात्री करावी.

८. प्रवेशपत्रांची छपाई झाल्यानंतर पत्रव्यवहार करताना विद्यार्थ्यांच्या आवेदनपत्राची छायांकित प्रत पाठविणे आवश्यक आहे अन्यथा अशा पत्रव्यवहाराचा विचार केला जाणार नाही. त्यासाठी संस्थेने/उमेदवाराने शिक्षणाधिकाऱ्यांना आवेदनपत्राची छायांकित प्रत सादर करण्यापूर्वी प्रत्येक आवेदनपत्राची छायांकित प्रत काढून ठेवावी.

९. अंध विद्यार्थ्यांना इंग्रजी टंकलेखन ३० श.प्र.मि. परीक्षेस मदतनीस (सनेत्र वाचक) घेऊन बसण्यासाठी शासनाने शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. : बीजीई २००१/९३९७५/(१९०/२००१)/साशि-१, दि. १०/१०/२००१ नुसार मान्यता दिलेली आहे. तसेच अंध विद्यार्थ्यांना सनेत्र वाचकाने (मदतनीस) वाक्य, शब्द वाचल्यानंतर ते टंकलिखित करण्यास उशीर लागण्याची शक्यता लक्षात घेऊन टंकलेखन परीक्षेच्या विभाग दोन साठी (गती उतारा) ७ मिनिटां ऐवजी १० मिनिटे म्हणजेच ३ मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यास शासनाने शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.: बीजीई २००१/९३९७५/(१९०/२००१)/साशि-१, दि. ३१ डिसेंबर २००१ नुसार मान्यता दिलेली आहे.

१०. अपंग विद्यार्थ्यांना टंकलेखन कौशल्य प्राप्त करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अवयवामध्ये म्हणजे हात किंवा बोटे यामध्ये ६० % टक्के किंवा त्याहुन अधिक कायम स्वरूपी अपंगत्व आलेले असल्यास व जिल्हा शल्य चिकित्सकांनी (जिल्हा सिव्हिल सर्जन) तसे प्रमाणित केलेले असल्यास ३० श.प्र.मि. गतीची परीक्षा, या टंकलेखनाच्या परीक्षेतील गती उताऱ्यासाठी अपंग उमेदवारास ७ मिनिटां ऐवजी १० मिनिटे म्हणजेच ३ अधिक मिनिटांची सवलत देण्यास शासनाने, शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.:बीजीई-१०९४/(७५/९४)/माशि-८, दि. ३० ऑक्टोबर १९९५ नुसार मान्यता दिलेली आहे.

११. आवेदनपत्रात खोटी माहिती देणे, आवेदनपत्रासोबतच्या दस्तऐवजात खाडाखोड करुन सादर करणे या कारणांमुळे उमेदवार परीक्षेसाठी कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरेल व त्याची/तिची सदर परीक्षेची संपादणूक रद्द होईल.

१२. उमेदवार, संस्थाचालक व प्राचार्य यांनी आवेदनपत्रावरील Submit या बटनावर क्लिक करण्यापूर्वी आवेदनपत्रामधील आवश्यक असलेले सर्व रकाने बरोबर भरले असल्याची खात्री करावी.

१३. पूर्वअट पूर्तता लागू असलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या आवेदनपत्राच्या छायाप्रतीस पूर्व अट पूर्ततेसंबंधीच्या **प्रमाणपत्रांच्या प्रती स्टेपल करुन स्वंतत्र पाकिटात सादर करावेत व बॅचलिस्ट, प्रपत्रे व इतर कागदपत्रे आवेदनपत्रांच्या प्रतींसोबत न बांधता स्वतंत्ररित्या दुसऱ्या पाकिटात सादर करावेत.**

१४. **परीक्षार्थीने एका विषयासाठी एकच आवेदनपत्र सादर करावे. एकाच विषयाची एकापेक्षा जास्त आवेदनपत्रे सादर केल्यास त्या विषयाची सर्व आवेदनपत्रे रद्द करण्यात येतील. परीक्षार्थींनी एकाच विषयाची एकापेक्षा जास्त आवेदनपत्रे त्याच किंवा इतर संस्थेमधून भरली नसल्याची संस्थाचालकांनी खात्री करावी.**

१५. हिंदी लघुलेखन ६०,८०,१०० व १२० शप्रमि. आणि इंग्रजी लघुलेखन उच्च गती १३०, १४०,१५० व १६० परीक्षा फक्त ११५२-मुंबई, २१५१-पुणे, ५१५१-औरंगाबाद व ७१५१-नागपूर याच केंद्रावर घेतल्या जातील. संस्थाचालकांनी आपल्या विभागाच्या संबंधित केंद्रावरच विद्यार्थी प्रविष्ट होतील, याची नोंद घ्यावी व त्यानुसार आवेदनपत्रे भरावीत.

१६. पूर्व अट पूर्ततेबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| SR. NO. | NAME OF THE SUBJECT & SPEED | SUBJECT CODE | PRECONDITIONS REQUIRED |
|---|---|---|---|
| 1 | ENG. T/W 30 | 10 | टंकलेखन पात्रता पुर्वअट नाही |
| 2 | *ENG. T/W 40 | 11 | ENG. T/W 30 |
| 3 | ENG. T/W 50 | 12 | ENG. T/W 30 |
| 4 | ENG. T/W 60 | 13 | ENG. T/W 30 |
| 5 | MARATHI T/W 30 | 21 | टंकलेखन पात्रता पुर्वअट नाही |
| 6 | *MARATHI T/W 40 | 22 | MARATHI T/W 30 |
| 7 | HINDI T/W 30 | 31 | टंकलेखन पात्रता पुर्वअट नाही |
| 8 | *HINDI T/W 40 | 32 | HINDI T/W 30 |
| 9 | ENG. S/H 60 | 50 | ENG. T/W 30 |
| 10 | ENG. S/H 80 | 51 | ENG. S/H 60 |
| 11 | ENG. S/H 100 | 52 | ENG. T/W 50 + ENG. S/H 60 |
| 12 | ENG. S/H 120 | 53 | ENG. T/W 50 + ENG. S/H 60 |
| 13 | ENG. S/H 130 | 54 | ENG. T/W 50 + ENG. S/H 60 |
| 14 | ENG. S/H 140 | 55 | ENG. T/W 50 + ENG. S/H 60 |
| 15 | ENG. S/H 150 | 56 | ENG. T/W 50 + ENG. S/H 60 |
| 16 | ENG. S/H 160 | 57 | ENG. T/W 50 + ENG. S/H 60 |
| 17 | MARATHI S/H 60 | 60 | MARATHI T/W 30 |
| 18 | MARATHI S/H 80 | 61 | MARATHI S/H 60 |
| 19 | MARATHI S/H 100 | 62 | MARATHI T/W 40 + MARATHI S/H 60 |
| 20 | MARATHI S/H 120 | 63 | MARATHI T/W 40 + MARATHI S/H 60 |
| 21 | HINDI S/H 60 | 70 | HINDI T/W 30 |
| 22 | HINDI S/H 80 | 71 | HINDI S/H 60 |
| 23 | HINDI S/H 100 | 72 | HINDI T/W 40 + HINDI S/H 60 |
| 24 | HINDI S/H 120 | 73 | HINDI T/W 40 + HINDI S/H 60 |

**(* मराठी/इंग्रजी/हिंदी ३० व ४० श.प्र.मि. विषयाकरिता विद्यार्थी एकाच वेळी परीक्षेस प्रविष्ठ होऊ शकतात परंतु मराठी/इंग्रजी/हिंदी ४० श.प्र.मि. विषयाकरिता विद्यार्थ्यास मराठी/इंग्रजी/हिंदी ३० श.प्र.मि. या विषयामध्ये उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील तसेच ३० श.प्र.मि. या विषयामध्ये उत्तीर्ण न झाल्यास ४० श.प्र.मि. या विषयाचा निकाल अनुत्तीर्ण देण्यात येईल.)**

१७. पूर्व अट पूर्ततेसाठी सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती राजपत्रित अधिकारी / माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक यांनी साक्षांकित केलेल्या असाव्यात. परिषदेने मूळ प्रमाणपत्रांची मागणी केल्यास ती त्वरित सादर करावीत. उमेदवाराने पूर्व अटीची पूर्तता केली नसल्यास त्याचे आवेदनपत्र स्वीकारले जाणार नाही. तसेच परीक्षापूर्व किंवा परीक्षोत्तर अशा कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने **पूर्व अट पूर्तता केली नसल्याचे आढळून आल्यास त्याची सदर परीक्षेची संपादणूक आपोआप रद्द होईल.** प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती, फोटो आयडेंटीफिकेशन क्रमांक खोटा/चुकीचा असल्याचे आढळल्यास सदर संस्थेची शासन मान्यता काढून घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

१८. पूर्व अटींच्या संदर्भात जोडलेल्या प्रमाणपत्रामधील व आवेदनपत्रामधील नावांत बदल असेल तर नांव बदलाबाबत पुढील कागदपत्रापैकी राजपत्रित अधिकाऱ्यांनी साक्षांकित केलेला कोणताही एक पुरावा आवेदनपत्रासोबतच्या कागदपत्रांमध्ये जोडावा.

(अ) राजपत्रामधील नाव बदलाची नोंद.

(ब) न्याय दंडाधिकारी/न्यायालय यांनी नाव बदलासाठी दिलेले आदेश.

(क) सक्षम प्राधिकाऱ्याने (विवाह नोंदणी रजिस्ट्रार) विवाह नोंदणी केल्याचा दाखला.

१९. शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा जून-२०१५ साठी टंकलेखन संस्थाचालकांनी परीक्षाविषयक कामासाठी प्रत्येक संस्थेकडून विहित नमुन्यात प्रत्येक बार्बीसाठी (परीक्षक/ समीक्षक /प्रपाठयवाचक) किमान एक संमतीपत्र या परिषदेस आवेदनपत्रासोबत पाठविणे बंधनकारक राहिल. अन्यथा आपल्या संस्थेचे आवेदनपत्र स्विकारले जाणार नाहीत व त्यामुळे विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानीस संस्थाचालक म्हणून आपण सर्वस्वी जबाबदार रहाल. संमतीपत्राचा विहित नमुना या अधिसूचनेत पृष्ठ क्र. १४ व १५ वर देण्यात आलेला आहे.

२०. **संस्थाचालकाने कोणत्याही अनधिकृत टंकलेखन संस्थेच्या विद्यार्थ्याचे आवेदनपत्र आपल्या संस्थेमार्फत भरु नयेत. तसे निदर्शनास आल्यास आपल्या संस्थेची शासन मान्यता काढून घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.**

२१. **विद्यार्थ्यांची परीक्षेपर्यंतची उपस्थिती ८० % असणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांची परीक्षेपर्यंत ८० % उपस्थिती म्हणजेच ४ महिने किंवा ८० कार्यालयीन तास प्रशिक्षण पुर्ण होत नाही, अशा विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे वितरीत करु नयेत, वितरीत केलेस व असे विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झालेचे परीषदेच्या निदर्शनास आल्यास विद्यार्थ्यांची सदर परीक्षेची संपादणुक रद्द करण्यात येऊन आपल्या संस्थेवर योग्य ती कारवाई करण्यात येईल. याबाबत भविष्यात तक्रार प्राप्त होऊन त्यात सत्यता आढळुन आल्यास त्याकरिता संस्थाचालक म्हणून आपण सर्वस्वी जबाबदार रहाल.**

२२. परिषदेच्या संकेत स्थळावर आपल्या संस्थेची संपुर्ण माहिती "टंकलेखन/लघुलेखन संस्था ऑनलाईन माहिती प्रपत्रात" ऑनलाईन भरण्यात यावी. सदर माहिती न भरल्यास ऑनलाईन आवेदनपत्र भरता येणार नाहीत व सदर संस्थेवर परिषदेकडून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल व ती संस्थेस बंधनकारक राहील.

**(श्री. व्ही. बी. पायमल)**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-४११ ००१.**

**प्रत माहितीस्तवः-**

१. सर्व विभागीय शिक्षण उपसचालक, महाराष्ट्र राज्य.
२. सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य.
३. शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई (उत्तर/दक्षिण/पश्चिम)